## नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ६०१/२०२० मधील
## निशाण १३५ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

३. प्रतिवादी क्र.१८, १९अ ते १९ड, २० ते २२ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांना याकामी हजर होऊन मुदतीत कैफियत द्यावयाची होती. परंतु, दरम्यानचे काळात कोव्हीड–१९ या विषाणूचे संसर्गजन्य साथीमुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन असल्यामुळे त्यांना याकामी मुदतीत कैफियत देता आली नाही. वादी यांनी प्रतिवादी यांचे अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, या प्रतिवादींनी अर्जात केलेली कथने पाहता त्यांनी अर्जात नमूद केलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी हा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. त्यामुळे, या प्रतिवादींना त्यांची बाजू सक्षमरित्या मांडता यावी, यासाठी त्यांना याकामी हजर होणेस व कैफियत दाखल करणेस परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रतिवादी क्र. १८, १९अ ते १९ड, २० ते २२ यांचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१८,१९अ ते १९ड, २० ते २२ यांचेविरुध्द तांत्रिकदृष्टया झालेला एकतर्फा व विना कैफियतेचा आदेश रद्द करणेत येत आहे व त्यांना याकामी हजर होणेस व कैफियत सादर करणेस परवानगी देणेत येत आहे.

Digitally signed by Dhiraj Maruti Hinglajkar
Date: 2021.03.26 15:13:19 +0530

–

दिनांक २५/०३/२०२१ (डी.एम.हिंग्लजकर)

ठिकाण विटा. ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली.